संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# लोकशाहीतील उत्सवमूर्तीच दुर्लक्षित

भारत हे जगातील सर्वात मोठे राष्ट्र म्हणून ओळखले जाते. त्याची महत्त्वाची तीन लक्षणे आहेत. एक म्हणजे भारताचे लोकशाहीचे संवर्धन करणारे ऐतिहासिक संविधान लोकशाही प्रक्रियेत सहभागी होणारे सर्वाधिक मतदान आणि या सर्व लोकशाही प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या निवडणुकांचे संचलन करणारा निवडणूक आयोग हीच त्याची सर्वात मोठी उपलब्धी ठरते. आजच्याच दिवशी १९५० साली भारताच्या निवडणूक आयोगाची स्थापना झाली होती. आणि या निवडणूक प्रक्रियेत अधिकाधिक युवकांनी सक्रिय सहभागी व्हावे या उद्देशाने २०११ पासून २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदाता दिवस म्हणून साजरा होऊ लागला. लगेच पुढच्याच दिवशी म्हणजे २६ जानेवारीला भारताचे संविधानही स्वीकारले गेले. आणि जनतेने जनतेसाठीच राबवलेली ही लोकशाही प्रक्रिया असल्याने तो दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून घोषित केला गेला. या तीनही घटना सलगपणाने लक्षात घेतल्या तर जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीप्रधान देशाचे वैशिष्ट्य सहजपणाने लक्षात येते. भारताच्या या संसदीय लोकशाहीत संसदेला जरी महत्त्व असले किंवा सगळ्या देशाचा राज्यकारभारावर संसदेचे किंवा राज्यपातळीवर विधिमंडळाचे नियंत्रण जरी असले तरी त्या संसद विधिमंडळापेक्षा मतदार अधिक महत्त्वाचा ठरतो. म्हणूनच आता राष्ट्रीय मतदाता दिवस हा खऱ्या अर्थाने लोकशाही व्यवस्थेचा विचार करणारा महत्त्वाचा दिवस म्हटला पाहिजे. दुर्दैवाने या राष्ट्रीय मतदाता दिवसाविषयी राज्यकर्त्यांकडून किंवा राजकीय पक्षांकडून फारसे महत्त्व दिले जात नाही. केवळ निवडणुकीच्या काळात ज्याला राजा म्हणून गौरवले जाते. तो मतदार प्रत्यक्ष राष्ट्रीय मतदातादिवशीसुद्धा दुर्लक्षित राहावा हे खेदजनकच म्हणावे लागेल. खरे तर आजचा दिवस हा केवळ राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा न होता तो मतदाता सन्मान दिवस म्हणून पाळला गेला पाहिजे. कारण संपूर्ण लोकशाहीचा पाया किंवा आधार हा मतदार असतो. त्या मतदाराला तू केवळ मतदार आहेस आणि मतदान करणे तुझे कसे कर्तव्य किंवा अधिकार आहे याचमद वारंवार स्मरण करून देण्याची गरज नाही.

### स्वार्थी राजकीय पक्ष

निवडणुकांच्या काळामध्ये मतदाराला राजा म्हणून राजकीय पक्ष डोक्यावर घेण्याचा प्रयत्न करतात. तो सगळा त्यांचा सत्तेसाठीचा राजकीय डाव असतो. परंतु ज्याच्यामुळे लोकशाही टिकून आहे. किंवा मस्तवाल झालेल्या राजकीय पक्षांना धडा शिकवण्याचे काम फक्त मतदारच करू शकतो अशा प्रकारची विचार आणि कृती करण्याची शक्ती जर मतदानामध्ये असेल तर त्याच्या या शक्तीचा वेगवेगळ्या उपक्रमांमधून सन्मान झाला पाहिजे. निवडणूक आयोगाने अधिकाधिक वेळा मतदान करणाऱ्यांचा सन्मान करण्यापासून ते वयोवृद्ध आणि सर्वात तरूण अशा मतदारांनादेखील गौरवण्याचा उपक्रम राबवला पाहिजे. राष्ट्रीय मतदाता दिवस साजरा करण्यामागचा निवडणूक आयोगाचा उद्देश अगदी स्पष्ट आहे. मतदान प्रक्रियत अधिकाधिक लोकांनी सहभागी व्हावे, हे त्यामागचे प्रमुख उद्दीष्ट असते याशिवाय भारताची एकूण लोकसंख्या लक्षात घेतली तर त्यामध्ये ६० ते ६५ टक्के तरूणांचे प्रमाण आहे. त्या तरूण मतदारांना प्रोत्साहित करण्यासाठी हा राष्ट्रीय मतदाता दिवस घोषित केला गेला होता. प्रोत्साहन द्यायचे असेल तर त्यात तरूण मतदारांचा उत्साह वाढेल अशा प्रकारचे उपक्रम खूप महत्त्वाचे ठरतात. अगदी मतदार आणि मतदान हे दोन घटक लोकशाहीसाठी कोणकोणत्या अर्थाने महत्त्वाचे आहेत. याविषयावरच्या लेखस्पर्धा, निबंधस्पर्धा किंवा प्रदर्शने भरवण्यापर्यंत अनेक नवीन संकल्पना राबवता येऊ शकतात. आपल्या संविधानाने जी लोकशाही मूल्ये सांगितली आहेत त्याविषयीचे जनजागरणही केले पाहिजे. संविधानातूनच सामान्य मतदाराचा हक्क अबाधित ठेवण्याचे अभिवचन दिले गेले आहे. म्हणजेच संविधान आणि मतदान याचा कसा घनिष्ठ संबंध आहे हेसुद्धा वारंवार सामान्य जनतेलाही समजून सांगण्याची आवश्यकता आहे. मतदारालासुद्धा आपली नेमकी ताकद काय आहे हे कोणीच लक्षात आणून देत नाही. केवळ मतदान करणे एवढ्यापुरतेच आपले काम असल्याचा एक गैरसमज निर्माण झालेला आहे. परंतु निवडणूकांशिवाय इतर काळातसुद्धा मतदाता हा लोकशाहीचा संरक्षणकर्ता आहे, हे बिंबवले गेले पाहिजे.

### पक्षांसाठी कार्यक्रम संहिता हवी

आपल्या देशातले राजकीय पक्ष हे इतके स्वार्थी आहेत की त्यांना निवडणूका हा लोकशाहीचा उत्सव वाटतो. पण त्या उत्सवाचा खरा उत्सवमूर्ती असलेला मतदाता इतर काळामध्ये महत्त्वाचा वाटत नाही. किंबहुना निवडणूकीनंतर ती उत्सवमूर्ती अक्षरशः पाच वर्षे पुन्हा दुर्लक्षित होते. म्हणूनच निवडणूक आयोगाच्या स्थापनेचा दिवस आणि राष्ट्रीय मतदातादिवस या दोघांचे एकत्रित महत्व एकाचवेळी सांगता येऊ शकते. खरे तर राजकीय पक्षांनी या राष्ट्रीय मतदाता दिवसाच्यानिमित्ताने अगदी वॉर्डावॉर्डमध्ये कार्यक्रम केले पाहिजेत. आणि अधिकाधिक मतदारांची नावनोंदणी होईल त्यांना त्यांची ओळखपत्र मिळतील. असादेखील उद्देश त्यातून साधता येऊ शकतो. पण राजकीय पक्षांना त्याविषयी अजिबात उत्साह दिसत नाही. म्हणजे मतदारांविषयीची ही सापत्नपणाचीच भावना राजकीय पक्षांमध्ये असते. यावर्षी या पंधराव्या मतदाता दिवसाच्यानिमित्ताने निवडणूक आयोगाने काही कार्यक्रम आयोजित केले आहेत ज्यामध्ये शपथ देण्याचाही कार्यक्रम केला आहे. परंतु निवडणूक आयोगाने संपूर्ण वर्षभर विविध प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन केले पाहिजे आणि त्यात राजकीय पक्षांनाही सहभागी करून घेतले पाहिजे. मतदान काळामध्ये उमेदवारांसाठी आचारसंहिता लावली जाते. तशीच राष्ट्रीय मतदारा दिवसासाठीसुद्धा राजकीय पक्षांना कार्यक्रम संहिता देऊन हे कार्यक्रम साजरे करण्याची सक्ती केली पाहिजे. संविधान दिवस आणि राष्ट्रीय मतदार दिवस या दोन दिवशी जे राजकीय पक्ष स्वयंस्फूर्तीने आणि लोकशाहीविषयीच्या आस्थेने उपक्रम करतील तेच लोकशाहीविषयी संवेदनशील आहेत असे म्हणता येऊ शकेल.